निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१ /का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ११ डिसेंबर, २०२०

प्रति,
**जिल्हाधिकारी** *(सर्व),*
*(गडचिरोली, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून).*

**विषय:- माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित सुमारे एकूण १४,२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम.**

संदर्भ :- १. आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.७/का-५, दिनांक १७/०३/२०२० चे आदेश.
२. आयोगाचे समक्रमांकाचा दिनांक १९/११/२०२० चा निवडणूक कार्यक्रम रद्द आदेश.
३. आयोगाचे समक्रमांकाचा दिनांक २०/११/२०२० चा मतदार यादी कार्यक्रम आदेश.
४. आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.१३/का-८, दि.२९/११/२०१९ चे निवडणूक पूर्वतयारीबाबतचे आदेश

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. मार्च २०२० दरम्यान कोविड- १९ या साथीच्या आजाराच्या संसर्गाची गंभीर परिस्थिती उद्भवल्याने मार्च २०२० मध्ये होणाऱ्या सुमारे १५६६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका (माहे एप्रिल २०२० ते जून २०२० मध्ये मुदत संपलेल्या) आयोगाच्या दिनांक १७/०३/२०२०च्या आदेशान्वये स्थगित करण्यात आल्या होत्या.

३. उक्त निवडणुकांचा मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या दिनांक १९/११/२०२०च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे.

४. आता आयोगाच्या दिनांक २०/११/२०२० चे आदेशान्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० मध्ये मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम सुरु आहे. या कार्यक्रमानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींसाठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असून दिनांक ०७/१२/२०२० पर्यंत त्यावर

हरकती घेण्यात आल्या आहेत. दिनांक ०९/१२/२०२० च्या सुधारीत कार्यक्रमानुसार अंतिम मतदार यादी दिनांक १४/१२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

५. या निवडणुकांच्या पूर्वतयारीसाठी आयोगाच्या दिनांक २९/११/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सूचना दिलेल्या आहेत.

६. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणुकीच्या कार्यक्रम खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

**आदेश**

६.१ **परिशिष्ट-अ** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविलेल्या ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणुका घेण्यात याव्यात.

६.२ **माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित सुमारे १४,२३४ ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय** तपशील **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविलेला आहे.

६.३ मतदार यादी तसेच निवडणूक कार्यक्रम आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार विहित मुदतीत पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे.

६.४ निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, **सदर निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.** या क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/ घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

६.५ **या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणालीद्वारेच** राबविण्यात यावी. आयोगाच्या दि.०५ फेब्रुवारी २०२० चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रान्वये संगणक प्रणालीतून नामनिर्देशनाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी सविस्तर निर्देश दिलेले आहेत. या निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, तहसिलदार व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घ्यावी.

६.६ **परिशिष्ट-अ** येथील निवडणूक कार्यक्रमानुसार फक्त गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरिता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व संबंधित जिल्ह्यात मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

६.७ निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपिलासंदर्भात) यांच्या स्तरावरून देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त

झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करून त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

६.८ ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्यादृष्टीने पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६.९ नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६.१० सदर निवडणूका पार पाडताना कोवीड १९ च्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येत आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक (ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सोबत: परिशिष्ट-अ आणि ब**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/ सचिव मंत्रालय, मुंबई-४०००३२.

३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

४. पोलीस महासंचालक, मुंबई, महाराष्ट्र राज्य.

**५. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ २५, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**याना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२. यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. विभागीय आयुक्त, (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

८. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, यांना उचित कार्यवाहीसाठी.

९. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४

यांना कळविण्यात येते कि, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करून देण्याची कृपया व्यवस्था करावी.

१०. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१३. जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व संबंधित).

१४. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१५. तहसिलदार, संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग यांना निवडणुकीच्या ऑनलाईन प्रक्रियेविषयक कार्यवाहीसाठी.

१६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना निवडणूक कार्यक्रमाच्या प्रसिध्दी विषयक कार्यवाहीसाठी.

१७. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१८. निवड नस्ती.

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०१ /का-०८, दि. ११ डिसेंबर, २०२० च्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-अ

**माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम.**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १. | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.१५/१२/२०२० (मंगळवार) |
| २. | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२३/१२/२०२० (बुधवार) ते दि.३०/१२/२०२० (बुधवार) वेळ स.११.०० ते दु.३.०० **(दिनांक २५, २६, व २७/१२/२०२० ची सार्व. सुट्टी वगळून)** |
| ३. | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.३१/१२/२०२० (गुरूवार) वेळ स.११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४. | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०४/०१/२०२१ (सोमवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५. | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.०४/०१/२०२१ (सोमवार) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६. | **आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक** | **दि.१५/०१/२०२१ (शुक्रवार)** स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० पर्यंत (गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दु.३.०० वा. पर्यंत) |
| ७. | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दि.१८/०१/२०२१ (सोमवार) |
| ८. | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.२१/०१/२०२१ (गुरूवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१ /का-०८, दि.११ डिसेंबर, २०२० च्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-ब

### माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १४,२३४ ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशील.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | १५८ |
| २ | | पालघर | ०३ |
| ३ | | रायगड | ८८ |
| ४ | | रत्नागिरी | ४७९ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ७० |
| कोकण विभाग एकूण | | | ७९८ |
| ६ | नाशिक | नाशिक | ६२१ |
| ७ | | धुळे | २१८ |
| ८ | | जळगाव | ७८३ |
| ९ | | अहमदनगर | ७६७ |
| १० | | नंदुरबार | ८७ |
| नाशिक विभाग एकूण | | | २४७६ |
| ११ | पुणे | पुणे | ७४८ |
| १२ | | सोलापूर | ६५८ |
| १३ | | सातारा | ८७९ |
| १४ | | सांगली | १५२ |
| १५ | | कोल्हापूर | ४३३ |
| पुणे विभाग एकूण | | | २८७० |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | ६१८ |
| १७ | | बीड | १२९ |
| १८ | | नांदेड | १०१५ |
| १९ | | उस्मानाबाद | ४२८ |
| २० | | परभणी | ५६६ |
| २१ | | जालना | ४७५ |
| २२ | | लातूर | ४०८ |
| २३ | | हिंगोली | ४९५ |
| औरंगाबाद विभाग एकूण | | | ४१३४ |
| २४ | अमरावती | अमरावती | ५५३ |
| २५ | | अकोला | २२५ |
| २६ | | यवतमाळ | ९८० |
| २७ | | वाशीम | १६३ |
| २८ | | बुलडाणा | ५२७ |
| अमरावती विभाग एकूण | | | २४४८ |
| २९ | नागपूर | नागपूर | १३० |
| ३० | | वर्धा | ५० |
| ३१ | | चंद्रपूर | ६२९ |
| ३२ | | भंडारा | १४८ |
| ३३ | | गोंदिया | १८९ |
| ३४ | | * गडचिरोली | ३६२ |
| नागपूर विभाग एकूण | | | १५०८ |
| एकूण | | | १४२३४ |

* टिप :- गडचिरोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र निवडणूक कार्यक्रम देण्यात येत आहे.